महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ २० /२०२३ दि. ३/०१/२०२३

## –:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात नागरी संकुले, शाळा, कॉलेज, हॉस्पिटल्स, इत्यादीच्या संख्येत झालेली वाढ व मोठया प्रमाणात उभी राहिलेली व्यापारी संकुले उदा. मॉल्स, मल्टिप्लेक्स थिएटर्स, इत्यादीमुळे येणाऱ्या–जाणाऱ्या वाहनांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे वाहन पार्किंगची गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. कोळसेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीमध्ये वाहनचालकांकडून रस्त्यांवर अस्ताव्यस्त दुतर्फा पार्किंग केली जात असल्याने रस्त्यावरील वाहतुकीस दैनंदिन अडथळा निर्माण होत आहे. अरूंद व कायम गर्दीचे रस्ते, उड्डाणपूल खालील मोकळी जागा वर्दळीचे चौक व चौकाचा परिघ, शाळा तसेच रूग्णालयांचे प्रवेश व निकास मार्ग, इत्यादी ठिकाणी वाहनचालकांकडून असुरक्षितपणे वाहन पार्किंग करण्यात येत असल्याने रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

**ज्याअर्थी,** शहरातील मुख्य बाजारपेठ, रेल्वे स्थानक, बस स्थानक, इत्यादीकडे जाणाऱ्या मार्गावर सुरक्षित वाहनतळ उपलब्ध नसल्याने वाहनचालकांकडून बेफिकीरपणे वाहने उभी केली जात असल्याने वाहन पार्किंगच्या जागा निश्चित करणे आवश्यक असल्याने सदर भागात वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील व कोळसेवाडी वाहतूक उप विभाग कल्याण पुर्व हद्दीतील सध्याची वाहतुकीची परिस्थिती व वाहन पार्किंग करीता उपलब्ध असलेली जागा इत्यादीचे सर्वेक्षण करून १) रस्त्याच्या दुतर्फा नो पार्किंग, २) सम–विषम पार्किंग (Odd & Even Parking) याप्रमाणे वाहन पार्किंग जागेचे वर्गीकरण करण्यात येवून या वर्गीकरणाप्रमाणे अरूंद व कायम गर्दीचे रस्ते वगळून, उड्डाणपूल, चौक व चौकाचा परिघ वगळून, शाळांच्या प्रवेश मार्गावर व रूग्णालयांचे प्रवेश व निकास मार्ग वगळून तसेच मुख्य बाजारपेठेकडे जाणाऱ्या व रेल्वे/बस स्टेशनकडे जाणाऱ्या मार्गावर वाहतूक कोंडी होणार नाही अशा पध्दतीने दृष्टीक्षेप ठेवून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या क्षेत्रातील व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे अखत्यारीतील पत्रीपूल ते लोढा पलावा या कल्याण शिळ राज्य महामार्गावर खालील ठिकाणी नो पार्किंग करीता जागा निर्धारित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | नो पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | कल्याण पुर्व पत्रीपूल ते डोंबिवली पुर्व लोढा पलावा दरम्यान कल्याण शिळ रोड रस्त्याचे दोन्ही बाजूस | नो पार्किंग | ९ किमी. | २४ तास |
| २ | मोती मिठाई चौक ते कावेरी चौक रस्त्याचे दोन्ही बाजूस | नो पार्किंग | १ किमी. | २४ तास |

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे, ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होई पावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

— मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
— मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
— मा. जिल्हाधिकारी, ठाणे
— मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
— मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
— प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
— पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण.
— पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
— परिवहन व्यवस्थापक, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
— विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
— नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
— ठाणे पोलीस पत्रक

**प्रत :—** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत :—** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :—** स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.

२/— म.न.पा.कल्याण—डोंबिवली च्या संबंधीत अधिका—यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner